Pune Police

सत्यमेव जयते

# प्रेस नोट दि.२५/०७/२०१७

मार्केटयार्ड पोलीस स्टेशन हद्दीत मे २०१७ पासुन दुचाकी वाहनावर येवुन पायी जाणारे इसमांचे जवळ जाऊन पत्ता विचारण्याचा बहाणा करुन त्यामध्ये त्या इसमास बोलण्यामध्ये गुंतवुन पैकी गाडीवरील एक इसम पायी चालणारे इसमाचे जवळ जाऊन दारु पिल्याचा बहाणा करुन अंगाशी लगट करुन न कळत त्या इसमाचे पँन्टचे खिशातील रोख रक्कम चोरुन नेण्याच्या घटना घडत असल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे मार्केटयार्ड पोलीस स्टेशन यांनी एक पथक नेमले. सदर पथकास सविस्तर सुचना देवुन व हद्दीत घडलेल्या घटनांच्या ठिकाणचे सी सी टी व्ही फुटेज प्राप्त करुन आरोपींची शोध मोहिम चालु केली. हद्दीमध्ये सापळा लावला.दि. २३/०७/२०१७ रोजी सदर पथकातील पोशि १०२२८ बी.एम.मुसळे व पोशि १०३०७ एस.पी.पोळेकर हे सापळा लावुन कोंढवा बिबवेवाडी रोड येथील रविराज क्रु मॉलजवळ थांबले असता दुचाकीस्वार **आकाश बाळु धुमाळ रा.गांधी चौक रामोशी आळी हडपसर पुणे व रोहन बलराम जाधव रा.हिंगणे मळा हडपसर पुणे** हे इसम नामे मुन्ना राककिसुन जयस्वाल रा.पापळ वस्ती बिबवेवाडी या इसमास पायी जात असताना पत्ता विचारण्याचा बहाणा करुन अंगाशी लगट करुन त्याच्या पँन्टच्या खिशातील पैसे घेवुन जात असताना वरील पोशि मुसळे व पोशि पोळेकर यांनी त्या दोन्ही दुचाकीस्वरांना जागीच पकडुन ताब्यात घेवुन पोलीस स्टेशनला आणले व त्यांच्याकडे चौकशी करता त्यांनी व त्यांचा अन्य दुसरा साथीदार **अक्षय भारत कंटाळे ऊर्फ जगताप रा.महादेव नगर मल्हार कॉलनी गोपाळकट्टी मांजरी पुणे** यांनी मिळुन पुणे शहरात खालील प्रमाणे चोरीचे एकुण १० गुन्हे केल्याचे उघडकीस आले.

१) मार्केटयार्ड पो स्टे गु र नं. ७९/२०१७ भादवि कलम ३७९,३४
२) मार्केटयार्ड पो स्टे गु र नं. १०९/२०१७ भादवि कलम ३७९,३४
३) मार्केटयार्ड पो स्टे गु र नं. १२६/२०१७ भादवि कलम ३७९,३४
४) मार्केटयार्ड पो स्टे गु र नं. १२९/२०१७ भादवि कलम ३७९,३४
५) मार्केटयार्ड पो स्टे गु र नं. १४२/२०१७ भादवि कलम ३७९,३४
६) मार्केटयार्ड पो स्टे गु र नं. १४५/२०१७ भादवि कलम ३७९,३४
७) सहकारनगर पो स्टे गु र नं. २०९/२०१७ भादवि कलम ३७९,३४
८) लष्कर पो स्टे गु र नं. १६२/२०१७ भादवि कलम ३७९,३४
९) भारती विद्यापीठ पो स्टे गु र नं. ३५०/२०१७ भादवि कलम ३७९,३४
१०) भोसरी पो स्टे गु र नं. ३२४/२०१७ भादवि कलम ३७९,३४
११) डेक्कन पो॰स्टे॰ गु॰र॰नं॰ ३४/१७ भा॰दं॰वि॰क॰ ३७९,३४

वरील गुन्हे करताना आरोपींनी वेळोवेळी **पांढ-या रंगाची करिझ्मा गाडी नं. एम एच १२ के के ७१५५ व काळ्या रंगाची बजाज पल्सर गाडी नं. एम एच १२ डी एक्स २०४४** वापरल्या आहेत. वरील दाखल सर्व गुन्ह्यात एकुण ४,९६,७०० /- रुपये ची रोख रक्कम आरोपींनी चोरली असुन त्यापैकी अटक आरोपींकडुन आज पावेतो तपासात रोख रक्कम रुपये २,२२,४५१/- व चोरलेल्या पैशातुन घेतलेला रुपये ५०,०००/- चा एक मोबाईल फोन तसेच रुपये ९०,०००/- किंमतीच्या करिझ्मा व पल्सर गाड्या असा एकुण ३,६२,४५१/- रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची करवाई मा.अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण विभाग श्री. सेनगावकर साहेब,पोलीस उप-आयुक्त परि-०२ श्री.मुंढे साहेब, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.डॉ. पवार साहेब स्वारगेट विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मोहन शिंदे, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. विजय देशमुख, पोलीस उप निरीक्षक होनराव, पोलीस उपनिरीक्षक धुमाळ, पोलीस नाईक १०८२ मोरे, पोलीस नाईक २९२० धोत्रे, पोलीस नाईक ६५५५ पडळकर, पोलीस नाईक ६५१२ वारुळे, पोशि ९८२० शेख, पोशि १०१४७ घुले पोशि १०२२८ मुसळे, पोशि १०३०७ पोळेकर यांनी केली आहे.

